श्रीः

# वृद्धि व क्षयतिथीचा वर्ज्यविचार

तिथि दोन प्रकारची असून त्यात पूर्णा, सखण्डा असे दोन भाग आहेत. सूर्योदयापासून ६० घटिका व्याप्ति असलेली पूर्णा असून ती संस्कार कर्म व इतर शुभकार्यात वर्ज्य आहे. तसेच क्षय झालेली तिथि वर्ज्य आहे असे मुहूर्तमार्तण्ड व मुहूर्तचिन्तामणि ग्रन्थात लिहिले आहे.

जन्मर्क्षमासतिथयो व्यतिपातभद्रा -
वैधृत्यमा-पितृदिनानि तिथिक्षयर्धी।
मुहूर्तचिन्तामणि - ३४

या ठिकाणी वृद्धितिथि व क्षयतिथि ही दोन्ही वर्ज्य म्हणून शुभाशुभप्रकरणात निरूपण केले आहे. "पीयूषधारा" या त्याच्या व्याख्यात या दोन तिथींचे विवरण सुद्धा केले आहे.

तिथिक्षयलक्षणं - यत्र यो वारः तिथिद्वयान्तं स्पृष्ट्वा तृतीयतिथेः कंचिदादिमं भागं स्पृशति तत्र वारे मध्यमा तिथिः क्षयसंज्ञा.

तिथिवृद्धिलक्षणं - यत्र या तिथिः वारद्वयान्तं स्पृष्ट्वा तृतीयवारस्य आदिमं कंचिद्भागं स्पृशति तत्र सा तिथिः वृद्धिसंज्ञा त्रिद्युःस्पृगित्यपि चेत्याहुः॥

जो वार दोन तिथींची समाप्तीचा स्पर्श करून तिसऱ्या तिथीच्या प्रारम्भकालाचा थोडा स्पर्श करतो त्या वारातील मध्यम तिथि जे असते ती क्षयतिथि.

जी तिथि दोन वारांची समाप्तिचा स्पर्श करून तिसऱ्या वाराचा प्रारंभातील थोडा भाग स्पर्श करेल ती तिथि वृद्धिसंज्ञक आहे. या दोन्ही तिथींचे उदाहरण आम्ही पंचांगात पाहतो.

तिथीचे ग्राह्यत्वाबद्दल विचार करताना धर्मसिंधूत "युग्मवाक्यादिना पूर्वविद्धायाः परविद्धाया वा तिथेर्ग्राह्यत्वम्" या वाक्यात पूर्वविद्धा अथवा परविद्धा असली तरच महाफलप्राप्ति होईल म्हणून "तिथ्योर्युग्मं महाफलम्"

असे युग्मवाक्यात सांगितले आहे. त्यामुळे फक्त ६० घटिका व्याप्ति असलेल्या वृद्धितिथीला कोणत्याही वेध नसल्याने । ती तिथि अग्राह्य असून दुसऱ्या दिवशी असलेल्या वृद्धितिथीचा अवशिष्ट भाग अग्राह्य होणार नाही. त्याला वेध असतोच.

या वेधनियमाप्रमाणे क्षयतिथीला सुद्धा वेध असल्याने ग्राह्य होईल का असा प्रश्न येईल. पण ती क्षयतिथि सूर्योदय पहात नसल्याने वर्ज्य आहे.

या क्षय व वृद्धि तिथींना वर्ज्य करण्यास उपोद्बलक म्हणून

स्युस्तिस्त्रस्तिथयो वारे एकस्मिन्नवमा तिथिः ।
तिथेर्वारत्रयं चैकात्र्यधुःस्पृक् द्वेऽतिनिन्दिते ॥ (वसिष्ठ)

असे वसिष्ठवचन दिले आहे. ज्या वारात तीन तिथि असतात ती क्षयतिथि, ज्या तिथीला तीन वारांचा संबन्ध असतो ती वृद्धितिथि असे वृद्धिक्षयतिथींचा संक्षेपाने लक्षण या ठिकाणी दिले आहे.

येथे वृद्धितिथीमध्ये "द्वेऽतिनिन्दिते" या शब्दापासून तीन वारांचा निषेध नसून मधला जो बाह्य घटिकात्मक व्याप्ति असलेली तिथि मात्र वर्ज्य आहे असा भाव स्पष्ट दिसतो. असा अर्थ नाही केला तर वृद्धितिथीला संबद्ध तीन्ही वार वर्ज्य करायला पाहिजे अशी आपत्ति येते.

या कारणाने दुसऱ्या दिवशी असलेल्या वृद्धितिथीचा अवशिष्ट भागाला वर्ज्य करण्याची आवश्यकता नाही.

श्रीशके १९३९ हेमलम्ब नामसंवत्सर मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थी
सौर व्यावहारिक दिनांक:- २२-११-२०१७.

राजेश्वरशास्त्री
प्रधानाध्यापक
श्रीशंकराचार्य संस्कृत पाठशाला धारवाड